# भारतीय राज्यघटनेतील घटनादुरुस्ती : विशेष संदर्भ 73 वी घटनादुरुस्ती

**डॉ. एच. एस. कुचेकर** तुकाराम कृष्णाजी कोलेकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय, नेसरी. ता.गडहिंग्लज. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. kuchekarhs77@gmail.com **मोबा. 9922346844**

---

**प्रस्तावना :-**

भारतीय संविधानाच्या कलम 368 मध्ये "संविधानात सुधारणा" अर्थात घटनादुरुस्तीची कार्यपद्धती देण्यात आलेली आहे. घटनादुरुस्तीच्या कलमाविषयी संविधान सभेत खूप कमी वेळ चर्चा झालेली आहे. कारण एक तर संविधान सभेला त्याची आवश्यकता भासेल असे वाटत नसावे, किंवा भारताला संविधानाच्या बाबतीत कोणताही पुर्वानुभव नव्हता. परंतु कालानुरूप घटनेत बदल करणे गरजेचे असते. याची जाणीव मात्र होती, पण ही घटना बदलाच्या प्रक्रियेत अतिशय ताठरपणा येऊ नये अथवा अतिशय लवचिकपणा देखील असू नये, याची काळजी घेत असतानाच ती प्रक्रिया जास्त किचकट होऊ नये याची काळजी देखील संविधान सभेने घेतलेली दिसते.[1]

परिवर्तन हा निसर्गाचा नियमच असतो. राष्ट्राचाही त्याला अपवाद असू शकत नाही. राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थिती अनेक कारणामुळे सारखी बदलत असते. देशाचे संविधान तयार होत असताना जी परिस्थिती असते ती कालांतराने तशीच राहत नाही. स्वाभाविकच बदलत्या परिस्थितीनुसार संविधानात योग्य ते फेरबदल करणे आवश्यक होवून बसते. काळानुसार बदल स्विकारणारी संविधानेच दीर्घकाळ टिकतात तसा बदल न स्विकारणारी संविधाने मात्र कालबाह्य ठरून उलथून टाकली जाण्याचा धोका संभवतो. प्रस्तूत लेखात भारतीय संविधानातील 73 वी घटनादुरुस्ती या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे**.**

**उद्देश:**

1. भारतीय संविधान दुरुस्तीची आवश्यकता विचारात घेणे.
2. भारतीय संविधानातील घटनादुरुस्तीच्या पद्धती पाहणे.
3. 73 वी घटनादुरुस्ती अभ्यासणे

**संशोधन पद्धती व स्त्रोत:** प्रस्तुत शोधनिबंधासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी द्वितीय साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. यात प्रामुख्याने संदर्भ ग्रंथ, संशोधन पत्रिका, विविध जर्नल्स मधील लेख इत्यादीचा आधार घेतला आहे.

**अभ्यास विषयाची व्याप्ती:** आजतागायत भारतीय राज्यघटनेमध्ये झालेल्या घटनादुरुस्त्यांचा विचार करता, अभ्यासविषय फारच व्यापक होऊ शकतो. म्हणून सदर लेखात संदर्भ म्हणून 73 वी घटनादुरुस्ती इतकाच मर्यादीत अभ्यासविषय घेतला आहे.

**घटनादुरुस्तीची आवश्यकता :** घटनादुरुस्ती आवश्यक का असते याचे स्पष्टीकरण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधान सभेतल्या शेवटच्या भाषणात दिले आहे. त्या भाषणात ते असे म्हणतात की, "राज्यघटनेत ज्या तत्त्वांचा समावेश करण्यात आलेला आहे, ती तत्वे म्हणजे आजच्या पिढीचे विचार आहेत. तसेच, ती तत्वे म्हणजे घटना समितीच्या सभासदांचे विचार होत." हे नमूद करून ते पुढे थॉमस जेफरसन यांचे याबाबतीतले विचार स्पष्ट करताना म्हणतात, "थॉमस जेफरसन यांनी असे म्हटले होते. की, प्रत्येक पिढी ही एक स्वतंत्र देश होय, असे मानले पाहिजे. आपल्या पिढीला बहुमताच्या आधारे बांधून घेण्याचा अधिकार तिला मिळालेला असतो. परंतु एका देशातील लोकांना दुसऱ्या लोकांना बांधून ठेवण्याचा जसा अधिकार नसतो, तशाच प्रकारे भावी पिढीला बांधून ठेवण्याचा या पिढीला अधिकार नसतो. याचा अर्थ पुढच्या पिढीला यात बदल करण्याचा अधिकार असला पाहिजे."[2]

भारतीय संविधान निर्मात्यांनी संविधान संशोधनाच्या आवश्यकतेचा विचार करून संविधान दुरुस्तीची पद्धती स्वीकारली. "आम्ही भारतीय संविधानाला एक ठोस आणि स्थायी स्वरूप देऊ इच्छितो. परंतु संविधानात कोणतीही गोष्ट चिरस्थायी नसते, जर आपण संविधान पूर्णपणे परिदृढ केले तर, त्यामुळे राष्ट्राची प्रगती खुंटते. परिणामतः राष्ट्रातील लोकांचे जीवनही खुंटते" असे मत पंडित जवाहरलाल नेहरू यांनी व्यक्त केले.[3]

**विशोधन प्रक्रिया (Amendment Process) :** संविधानाच्या तरतुदी विशोधनाच्या दृष्टीने तीन प्रकारात विभागल्या जातात. 1. संसदेच्या साध्या बहुमताने विशोधित होऊ शकणाऱ्या, 2. संसदेच्या विशेष बहुमताने विशोधित होऊ शकणाऱ्या आणि 3. संसदेच्या विशेष बहुमताबरोबरच निम्म्याहून अधिक राज्यांची अनुसंमती मिळाल्यावरच विशोधित होऊ शकणाऱ्या. या तीनपैकी कोणत्याही प्रकारच्या तरतुदीमध्ये विशोधन करायचे झाल्यास लोकसभा वा राज्यसभा या संसदेच्या कोणत्याही एका सभागृहात विशोधनविधेयक मांडून विशोधन प्रक्रिया सुरू केली जाऊ शकते. मात्र राज्यांच्या विधिमंडळांना संविधान-विशोधनाची प्रक्रिया सुरू करण्याचा कोणताही अधिकार नसतो.[4] संविधानाची विशोधन प्रक्रिया निर्धारित करीत असताना संविधानकारांनी ताठरता (rigidity) व लवचिकता (flexibility) यांचे संतुलन साधण्याचा प्रयत्न केला आहे

**भारतीय संविधानात घटनादुरुस्तीची पद्धती** : भारतीय राज्यघटनेच्या 368 व्या कलमांमध्ये घटनादुरुस्तीची पद्धत देण्यात आलेली आहे. घटनादुरुस्तीच्या वेगवेगळ्या तीन पद्धती आहेत.

**1.संसदेच्या साध्या बहुमताने** : घटनादुरुस्ती विधेयक संसदेच्या सभागृहात मांडण्यात येते. प्रत्येक सभागृहाने उपस्थित सभासदांच्या बहुमताने घटनादुरुस्ती विधेयक संमत केले आणि त्या विधेयकाला राष्ट्रपतीची संमती प्राप्त झाली तर साध्या बहुमताने घटनादुरुस्ती केली जाते. उदाहरणार्थ

1. घटकराज्यांची नावे, सरहद्दी अगर प्रदेश बदलविणे, नवीन घटकराज्ये निर्माण करणे. (कलम 3-4)
2. घटकराज्यातील विधानपरिषद नाहीशी करणे आगर निर्माण करणे. (कलम 169)
3. नागरिकत्वासंबंधीचे कायदे करणे, नागरिकत्व देणे व काढून घेणे (कलम 5 ते 11)
4. केंद्र आणि घटकराज्याची अधिकृत भाषा ठरविणे. (कलम 343, 345)
5.संसदेची गणसंख्या ठरविणे. (कलम 100 (3)
6.संसद सदस्यांचे वेतन आणि भत्ते ठरविणे. (कलम 106)
7. संसद सदस्यांचे विशेषाधिकार ठरविणे, (कलम 105 (3)
8. सर्वोच्य न्यायालयातील इतर न्यायाधीशांची संख्या ठरवणे. (कलम 124 (1)[5]

**2. संसदेच्या विशेष बहुमताने:** घटनादुरुस्तीचा ठराव संसदेच्या कोणत्याही सभागृहात मांडण्यात येतो. तो ठराव संसदेच्या प्रत्येक सभागृहाने उपस्थित राहून आणि मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने आणि प्रत्येक सभागृहाच्या एकूण सभासदसंख्येच्या बहुमताने संमत केला आणि त्याला राष्ट्रपतीची अनुमती प्राप्त झाली की संविधान दुरुस्ती होते.

घटनेतील बराचसा भाग ह्या दुरुस्तीप्रक्रियेद्वारे संशोधित होतो. उदा. मूलभूत अधिकार आणि राजनीतीची मार्गदर्शक तत्वे ह्यामध्ये वरील मार्गानेच घटनादुरुस्ती होते.

**3.संसदेच्या विशेष आणि घटकराज्यांच्या बहुमताने :** हा मार्ग अतिशय कठीण मार्ग आहे. घटनादुरुस्तीचा ठराव संसदेच्या कोणत्याही सभागृहात प्रथम मांडावा लागतो. तो ठराव संसदेच्या प्रत्येक सभागृहांने उपस्थित राहून आणि मतदान करणाऱ्या सभासदांच्या दोन तृतीयांश बहुमताने आणि प्रत्येक सभागृहाच्या एकूण सभासद संख्येच्या बहुमताने संमत करून ते विधेयक घटकराज्यांच्या संमतीसाठी पाठविण्यात येते. जर ह्या घटनादुरुस्ती विधेयकाला अर्ध्या किंवा अर्ध्यापेक्षा जास्त घटकराज्यांच्या विधिमंडळानी संमती दिली, तरच ती घटनादुरुस्ती होते. अशी घटनादुरुस्ती करताना घटकराज्यांच्या संमतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. ही प्रक्रिया संघराज्याचे स्वरूप व्यक्त करणारी आहे. अशी घटनादुरुस्ती पुढील बाबतीत करता येते

1.राष्ट्रपतीच्या निर्वाचन पद्धतीसंबंधीच्या तरतुदी.
2.केंद्र सरकार व राज्य सरकारे यांच्या कार्यकारी सत्तेच्या मर्यादा निर्धारित करणाऱ्या तरतुदी.
3.सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालये यांच्या अधिकार क्षेत्रासंबंधीच्या तरतुदी.
4.केंद्र- राज्ये यांच्यात विधिविषयक अधिकारांची सातव्या परिशिष्टाने केलेली वाटणी.
5.संसदेतील राज्यांचे प्रतिनिधित्व ठरविणाऱ्या तरतुदी आणि घटनादुरुस्तीविषयक कलमातील तरतुदी. इत्यादीचा समावेश.[6]

**त्र्याहत्तरावी घटनादुरुस्ती :-**1950 पासून आजपर्यंत भारतीय राज्यघटनेत अनेक वेळेस दुरुस्त्या करण्यात आल्या. परंतु 1993 साली केलेली 73 वी घटनादुरुस्ती ही विशेष लक्ष वेधून घेणारी घटनादुरुस्ती आहे. अनेकांनी तर या घटनादुरुस्तीस दुसरे स्वातंत्र्य म्हणून संबोधले आहे.[7]

पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कारकिर्दीत सप्टेंबर, 1991 मध्ये लोकसभेत पंचायत राज्यासंबंधीचे घटनादुरुस्ती विधेयक मांडले. त्या विधेयकास लोकसभेने 22 डिसेंबर, 1992 रोजी, तर राज्यसभेने त्यास 23 डिसेंबर, 1992 रोजी मान्यता दिली. 20 एप्रिल, 1993 रोजी राष्ट्रपतींची मंजुरी मिळाल्यानंतर पंचायत राज्यव्यवस्थेला घटनात्मक दर्जा प्राप्त झाला. 24 एप्रिल, 1993 पासून या महत्त्वपूर्ण "पंचायत राज" कायद्याची अंमलबजावणी सुरू झाली.

भारतीय संविधानाच्या 243 व्या कलमात पंचायत राज्यव्यवस्थेची तरतूद अनुच्छेद (कलम) 243 ते अनुच्छेद 243 (ओ) परिशिष्टात करण्यात आलेली आहे. या कायद्यानुसार भारतीय घटनेत अकरावे परिशिष्ट जोडण्यात आले. त्यात पंचायतीकडे सोपविण्यात आलेल्या 29 विषयांची यादी देण्यात आलेली आहे.

**त्र्याहत्तराव्या घटनादुरुस्तीची वैशिष्ट्ये:** चायत राजव्यवस्थेच्या संदर्भात 1993 चा घटनादुरुस्ती कायदा अतिशय महत्त्वाचा असल्याने या कायद्याची काही ठळक वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे:

1. व्याख्या - राज्यघटनेच्या 243 व्या कलमात पंचायत राज्यांशी संबंधित असलेल्या जिल्हा, पंचायत, ग्रामसभा, मध्यस्तर, गाव इत्यादी शब्दांच्या व्याख्या दिलेल्या आहेत. पंचायत राज्याच्या या घटकांच्या अर्थाबाबत कसलीही संदिग्धता राहू नये हा त्यामागील उद्देश आहे.

2. पंचायत राज्यांची स्थापना बंधनकारक – या घटनादुरुस्तीने पंचायत राज्यांची स्थापना करण्याचे बंधन प्रत्येक राज्यावर घातले आहे. त्यामुळे पंचायत राज्याची स्थापना ही आता राज्यांची "घटनात्मक जबाबदारी" ठरली आहे.

3. त्रिस्तरीय व्यवस्था: या घटनादुरुस्तीने प्रत्येक राज्यात ग्रामस्तर, मध्यस्तर आणि जिल्हास्तर अशा तीन स्तरावर पंचायत राज्याची स्थापना करण्यासंबंधी तरतूद केली आहे. राज्यघटनेच्या 243 -बी या कलमात असे म्हटले आहे, की, राज्यघटनेच्या या भागातील तरतुदीनुसार प्रत्येक राज्यात ग्राम, मध्य व जिल्हा स्तरांवर पंचायतींची स्थापना करण्यात येईल, मात्र ज्या राज्यांची लोकसंख्या 20

लाखापेक्षा कमी असेल, अशा राज्यात मध्यम स्तरांवरील पंचायतीची स्थापना केली नाही तरी चालेल, अशी सवलत देण्यात आली आहे.[8]

4.ग्रामसभा- कलम 243(अ) मध्ये ग्रामसभेच्या निर्मितीची आणि तिच्या अधिकाराची तरतूद केलेली आहे. गावातील ज्या नागरिकांची नावे मतदार यादीत असतील अशा नागरिकांचा समावेश ग्रामसभेत केला जातो. प्रत्येक घटक राज्याचे कायदेमंडळ ग्रामसभेचे अधिकार व कार्ये निश्चित करतात.

5.पंचायतीची रचना -कलम 243( क) मध्ये पंचायतीची रचना स्पष्ट करण्यात आलेली आहे. राज्य विधानमंडळ कायद्याद्वारे सर्व पंचायती संस्थांच्या सदस्यांची निवड नागरिकांकडून प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे केली जाते. तसेच पंचायत राज्याच्या कायद्यानुसार पंचायत राज्याच्या सभापतीच्या निवडीसंबंधी तरतूद करण्यात आलेली आहे.

6.आरक्षणाची व्यवस्था- भारतीय राज्यघटनेच्या (243 ड) नुसार पंचायत राज्यातील संस्थांमधील आरक्षण पुढीलप्रमाणे निश्चित केले जाते.

अ) पंचायत राज्यांच्या संस्थांत अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या लोकांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवण्याची तरतूद केलेली असते. अशा राखीव जागांचे वाटप विविध मतदारसंघांमध्ये आळीपाळीने केले जाते. अशा राखीव जागापैकी एक तृतीयांश जागा याच वर्गाच्या महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात.

ब) नागरिकांच्या मागास वर्गातील प्रवर्गाच्या लोकांना 27% जागा पंचायत राज्याच्या संस्थांत आरक्षित केल्या जातात. हे आरक्षण त्या संस्थेच्या विविध मतदार संघात आळीपाळीने ठेवले जाते. अशा राखीव जागापैकी एक तृतीयांश जागा याच प्रवर्गाच्या महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात.

क) पंचायत राज्याच्या संस्थांत महिलांना एकूण सदस्यसंख्येच्या एक तृतीयांश जागा राखीव ठेवल्या जातात. अशा महिलांसाठी राखीव ठेवलेल्या जागांचे आरक्षण आळीपाळीने सर्व जागांना लागू करण्यात येते.

7.पंचायत राज्यातील संस्थांचा कार्यकाल- कलम 243(इ) नुसार प्रत्येक पंचायत संस्था तिच्या पहिल्या बैठकीच्या दिनांकापासून पाच वर्षापर्यंत, त्या काळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली ती त्यापूर्वी विसर्जित झाली नसेल, तर अस्तित्वात राहील. पंचायत राज्यसंस्थांचा कार्यकाल पाच वर्षाचा समान ठेवलेला आहे. एखादी पंचायत संस्था निर्धारित काळापूर्वी बरखास्त झाली. तर सहा महिन्याच्या आत अशा बरखास्त केलेल्या संस्थेची निवडणूक घ्यावी लागते. परंतु निर्धारित केलेला कार्यकाल सहा महिन्यांपेक्षा कमी असेल. तर निर्धारित वेळेतच पंचायत राज्यसंस्थांच्या निवडणुका घेतल्या जातात.

8.सभासदांची अपात्रता-संविधानाच्या अनुच्छेद 243 (फ) प्रमाणे संबंधित राज्यात निवडणुकीच्या अपात्रतेसंबंधी कायद्याद्वारे एखाद्या व्यक्तीस अपात्र म्हणून घोषित केले असेल, तर अशा व्यक्तीस पंचायत राज्यसंस्थांच्या निवडणुकीस उभे राहता येत नाही.

9. पंचायत राज्यसंस्थांचे अधिकार व कार्ये- 73 व्या घटनादुरुस्तीनुसार कलम 243 (ग) मध्ये पंचायत राज्यसंस्थांचे अधिकार, जबाबदाऱ्या व कार्ये स्पष्ट करण्यात आलेली आहेत. या तरतुदीनुसार राज्यविधिमंडळ कायदे करून पंचायत राज्यसंस्थांना आवश्यक ते अधिकार देईल. आर्थिक विकास व सामाजिक न्याय यासाठी योजना तयार करणे आणि अशा योजनांची अंमलबजावणी करणे, या जबाबदाऱ्या पंचायत राज्यसंस्थांवर सोपविण्यात येतील. आर्थिक विकास व सामाजिक न्याय यासंबंधीची 29 विषयांची यादी संविधानाच्या 11 व्या अनुसूचीत (यादीत) दिलेली आहे.

10. आर्थिक अधिकार- 73 व्या घटनादुरुस्तीच्या अधिनियमानुसार 243 (ह) कलमात पंचायत संस्थांना आपापल्या कार्यक्षेत्रातील लोकांवर कर बसवण्याचे, ते वसूल करण्याचे व त्यांचा विनियोग करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. राज्य विधिमंडळ कायदा करून पंचायत राज्याच्या संस्थांकडून आकारण्यात येणारे कर आणि राज्याच्या संचित निधीतून पंचायत संस्थांना देण्यात येणारे अनुदान निश्चित करते.

11.वित्त आयोगाची स्थापना - 73 व्या घटनादुरुस्तीच्या अधिनियमानुसार घटक राज्याचा राज्यपाल पंचायत राज्यसंस्थांच्या आर्थिक स्थितीचे समीक्षण करण्यासाठी एका वित्त आयोगाची स्थापना करतो. राज्यपाल दर पाच वर्षांनी वित्त आयोगाची स्थापना करतो. (कलम 243 आय) वित्त आयोग पुढील कार्ये करीत असतो.

1.राज्यशासनाद्वारे आकारण्यात येणाऱ्या करांच्या माध्यमातून मिळणा-या उत्पन्नाची विभागणी राज्यशासन व पंचायत राज्यसंस्था यांच्यात कोणत्या पद्धतीने व्हावी हे निश्चित करणे.

2.पंचायत संस्थाद्वारे आकारण्यात येणारे कर निश्चित करणे.

3.राज्याच्या संचित निधीतून पंचायत राज्यसंस्थांना देण्यात येणारे अनुदान निश्चित करणे.

4.पंचायत राज्यसंस्थांची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी विविध प्रकारच्या उपाययोजना करणे.

12. पंचायत राज्यसंस्थांचे लेखा, लेखापरीक्षण - कलम 243 (जे) नुसार पंचायत राज्यसंस्थांचे हिशेब (लेखा) व हिशेबतपासणी (लेखापरीक्षण) यासंबंधीच्या तरतुदी करण्याचा अधिकार राज्य विधिमंडळास देण्यात आलेला आहे.

13. पंचायत राज्यसंस्थांच्या निवडणुका - कलम 243 (के) नुसार राज्यातील पंचायत राज्यसंस्थांच्या निवडणुका घेण्यासाठी राज्य निर्वाचन आयोगाची स्थापना करण्यात येते. राज्यपालाकडून निर्वाचन आयुक्ताची नियुक्ती करण्यात येते. पंचायत राज्याच्या संस्थांच्या

मतदार याद्या तयार करणे, निवडणुकांचे आयोजन करून त्यावर नियंत्रण व देखरेख करणे, निवडणुकांचा निकाल जाहीर करणे इ. कार्ये निर्वाचन आयोगाला करावी लागतात.

14. केंद्रशासित प्रदेशाला लागू - अनुच्छेद 243(एल) नुसार 73 व्या घटनादुरुस्तीनुसार करण्यात आलेल्या तरतुदी केंद्रशासित प्रदेशांना लागू होतात.

15.विवक्षित क्षेत्रांना हा भाग लागू नसणे- कलम 243 (एम) नागालँड, मेघालय, मिझोराम ही राज्ये, संविधानाच्या 244 व्या कलमात निर्देश केलेले अनुसूचित व जनजातीविषयक प्रदेश आणि इतर प्रदेश मणिपूर, दार्जिलिंग येथील पहाडी प्रदेश यांना 73 व्या घटनादुरुस्तीनुसार करण्यात आलेल्या तरतुदी लागू केल्या जाणार नाहीत.

16. पंचायती व विद्यमान कायदे अस्तित्वात राहणे- कलम 243 (एन)73 वी घटनादुरुस्ती अधिनियम 1992 च्या प्रारंभाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या सर्व पंचायती त्यांचा कालावधी समाप्त होईपर्यंत अस्तित्वात राहतील.

17.निवडणूकासंबंधीच्या बाबीमध्ये न्यायालयांनी हस्तक्षेप करण्यास विरोध- कलम 243(ओ) नुसार मतदारसंघाच्या सीमा निश्चित करणे किंवा मतदारसंघामध्ये जागांची वाटणी इ. संबंधित कोणत्याही कायद्याची प्रश्नास्पद करता येणार नाही.[9]

**त्र्याहत्तराव्या घटनादुरुस्तीचे महत्व** –

73 व्या घटनादुरुस्ती कायद्याला पंचायत राज्यव्यवस्थेच्या दृष्टीने अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या कायद्याने पंचायत राज्यसंस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून दिल्याने या संस्थांना विशेष प्रतिष्ठा लाभली आहे. राज्य सरकारने स्थापन केलेल्या आणि त्याच्या मर्जीनुसार कार्य करणाऱ्या दुय्यम स्वरूपाच्या संस्था हे पंचायत राज्यसंस्थांचे स्वरूप आता पूर्णपणे बदलले असून, राज्यघटनेने निर्माण केलेल्या स्थानिक पातळीवरील संस्था असे नवे स्वरूप त्यांना प्राप्त झाले आहे. त्या दृष्टीने या कायद्यातील राज्य निर्वाचन आयोग, राज्य वित्त आयोग, पंचायत राज्यसंस्था मधील राखीव जागा, यांचे अधिकार इत्यादी गोष्टीसंबंधीच तरतुदी अतिशय महत्त्वाच्या आहेत. मात्र पंचायत राज्यव्यवस्थेला घटनात्मक दर्जा व विशेष प्रतिष्ठा मिळवून देताना राज्यांच्या अधिकारावर मर्यादा पडणार नाहीत किंवा त्यांच्या अधिकारांचा संकोच होणार नाही, याचीही पुरेशी काळजी घेतली गेली आहे. त्याकरिता पंचायत राज्यांच्या निरनिराळ्या अंगासंबंधी आवश्यक ते कायदे करण्याचा अधिकार राज्यांच्या कायदेमंडळांना दिला आहे. स्थानिक शासन हा राज्यांच्या अखत्यारीतील विषय असल्याने या घटनादुरुस्ती कायद्याने राज्य सरकारांनाही पुरेसे महत्त्व दिले आहे. राज्य सरकार आणि पंचायत राज्यसंस्था यांच्यात योग्य समतोल साधण्याचे कार्य या कायद्याने केले आहे.[10]

**सारांश:** गेल्या 75 वर्षांमध्ये भारतीय समाजात मोठे बदल झाले. आजपावेतो आपल्या घटनेमध्ये जरी शंभरापेक्षा जास्त वेळा दुरुस्ती झालेली असली, तरी त्यामुळे तिची अधिमान्यता कमी झालेली नाही; कारण या दुरुस्ती सामाजिक बदलाची प्रक्रिया सुगम करण्यासाठी केल्या होत्या. भारतीय राज्यघटना सातत्याने सामाजिक न्याय आणि लोकशाही यांना जास्तीत जास्त खोलवर नेण्याचा प्रयत्न करीत आहे आणि गेल्या 75 वर्षांत निर्माण झालेल्या अनेक झंझावातांना तिने यशस्वीपणे तोंड देऊन, लोकशाही मार्गाने परिवर्तन करण्याची प्रक्रिया गतिमान केली आहे.

73 वी घटनादुरुस्ती अनेक अर्थाने लक्षणीय मानली जाते. या दुरुस्तीमुळे ग्रामीण संस्थांच्या रचना व कार्यात क्रांतिकारी व व्यापक स्वरुपाचे बदल झालेले आहेत. त्यामुळे काही लोक या दुरुस्तीला दुसरे स्वातंत्र्य वा क्रांती मानतात. लोकशाही विकेंद्रीकरणाच्या इतिहासातील क्रांतिकारी पाऊल म्हणून या दुरुस्तीचे वर्णन केले जाते. 73 व्या घटनादुरुस्तीने कलम 243 ते कलम 243 (ओ) मध्ये पंचायत राज व्यवस्थेबाबतच्या तरतुदी दिसून येतात. 73 व्या घटनादुरुस्तीने ग्रामीण स्वराज्य संस्थांमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणला. 73 व्या घटनादुरुस्तीने जनतेचा प्रत्यक्ष सहभाग व्हावा, यासाठी ग्रामसभेची तरतूद करण्यात आली आहे. या तरतुदीमुळे नागरिकांचा राजकीय सहभाग वाढलेला आहे. जनतेला ग्रामसभेचे हळूहळू महत्त्व पटत जाईल तसतसे जनता प्रत्यक्षपणे धोरण निर्धारण प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकेल.

**संदर्भग्रंथ-** 1. सोनकांबळे (डॉ). ह. नि. व जऊळकर दिलीप,( 2020), भारतीय संविधान शासन, प्रशासन व राजकारण, पार्थ पब्लिकेशन, औरंगाबाद, पृ. 285

2. सोनकांबळे (डॉ). ह. नि. व जऊळकर दिलीप,( 2020), कित्ता. पृ. 285

3. प्रा.घांगरेकर चिं. ग., (2015), भारतीय राज्यघटना स्वरूप व राजकारण, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर,पृ.65

4. भोळे (डॉ). भास्कर लक्ष्मण,(1990), भारतीय राज्यव्यवस्था, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृ.59

5. प्रा. घांगरेकर, चिं. ग., (2015), पूर्वोक्त पृ.66

6. भोळे (डॉ). भास्कर लक्ष्मण,( 2003), भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर, पृ. 506

7. प्रा. यमलवाड गोविंद, (2001), स्थानिक स्वराज्य संस्था, कल्पना प्रकाशन, नांदेड, पृ. 67

8. भणगे, (डॉ). रविंद्र पांडुरंग, (2012). भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन, जळगाव, पृ. 139-140

9. प्रा. पाटील बी. बी. आणि प्रा. डॉ. सौ. उर्मिला चव्हाण,( 2023), महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर, पृ.143-44

10. भणगे,( डॉ). रविंद्र पांडुरंग, (2012). पूर्वोक्त पृ.143